**वाचले :** १ मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांनी दिनांक ०६ डिसेंबर, २०२४ इ. रोजी प्रसिध्द् केलेली कनिष्ठ लिपीक संवर्गातील उमेदवार यांची निवड यादी.

२ मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक प्रशासन ३६/३७२, दिनांक २९ जुलै, २०२५ अन्वये कनिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचारी यांचे पदोन्नती आदेश.

३ प्रभारी प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचा दिनांक २५ जुलै, २०२५ इ. रोजीचा कार्यालयीन अहवाल व त्यावरील निम्नस्वाक्षरीत यांचा दिनांक २८ जुलै, २०२५ इ. रोजीचा आदेश.

## आदेश क्रमांक प्रशासन ३६/३७३

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर हे वर नमुद संदर्भ क्रमांक '१' नुसार कनिष्ठ लिपीक पदी निवड झालेले उमेदवार यांचे प्रथम नेमणुकीसंदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेत :—

| अनुक्रमांक | कनिष्ठ लिपीक निवड यादीमधील क्रमांक | उमेदवारांचे नाव व पत्ता | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | **५६** | **निकिता चंद्रकांत देसाई,** राहणार १२११, 'ए' वॉर्ड, पहिला बस स्टॉप, फुलेवाडी, कोल्हापूर. ४१६ ०१० | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी येथे श्री. अभिजीत अशोक मोरे, कनिष्ठ लिपिक यांची बदली झालेने. |
| २ | **५७** | **सत्यम महेंद्र कांबळे,** राहणार मुक्काम पोस्ट सुरुल, ता. वाळवा, जिल्हा सांगली. ४१५ ४०७. | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, राधानगरी येथे श्री. बबन ए. पोवार, कनिष्ठ लिपिक दिनांक ३१.०७. २०२५ इ. रोजी कार्यालयीन वेळेनंतर नियतवयोमानाने सेवानिवृत्त होत असलेने. |

वर नमुद उमेदवार यांची नेमणूक संबधीत पदावर तात्पुरते / तदर्थ स्वरुपात करणेत येत आहे. उपरोक्त उमेदवारांची वेतननिश्चिती एस—६, वेतनबॅण्ड रक्कम रुपये १९,९००—६३,२०० या सुधारीत वेतन संरचनेत रुपये १९,९००/— या मुळ वेतनावर निश्चित करणेत येत आहे.

वर नमुद उमेदवार यांनी यासोबत जोडणेत आलेला विहीत साक्षांकन नमुना भरुन कार्यालय प्रमुख यांचेमार्फत या कार्यालयाकडे तात्काळ पाठवून देणेचा आहे. उपरोक्त नमुन्यामध्ये उमेदवार यांनी आधार ओळखपत्र क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक तसेच उमेदवारांच्या कुटुंबातील सदस्य परदेशात अध्ययन करीत असल्यास अथवा राहत असलेस त्याबाबतची माहिती समाविष्ट करणे अनिवार्य राहील. ...२/—

**उपरोक्त उमेदवार यांनी दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ इ. रोजी अगर तेथून पुढे ०४ दिवसांत (सुट्टीचे दिवस वगळून) त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी संबधीत न्यायालयात हजर राहावे अन्यथा त्यांची नेमणुक तदर्थ स्वरुपाची असलेने ती आपोआप रद्द होईल आणि कनिष्ठ लिपीक पदाचे निवड यादीमधून त्यांचे नाव कमी करणेत येईल याची नोंद घ्यावी.**

उपरोक्त उमेदवार यांना कामावर रुजू झालेनंतर सदर कार्यालयीन अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल. तसेच त्यांना वैदयकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य असेल. जर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर या कार्यालयास १ महिन्याची आगाऊ लेखी सुचना दिली पाहिजे, किंवा तसे न करता राजीनामा दिलेस १ महिन्याच्या लेखी सुचनेऐवजी १ महिन्याचे वेतना इतके रोख रक्कम (वेतन संरचनेतील (Matrix) वेतन) या कार्यालयात जमा केली पाहिजे.

उमेदवारांनी नेमणूकीच्या ठिकाणी हजर होताना त्यांचा स्वत:चा मुळ फोटो असलेले ओळखपत्र (पॅन कार्ड, ड्रायव्हींग लायसेन्स, आधार कार्ड इ. यापैकी एक) यासह हजर व्हावे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/ सेवा–४, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ आणि शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा–४, दिनांक ०७ जुलै, २००७ नुसार असे सुचित करणेत येते की, "१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल मात्र सद्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही."

| | | |
|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय, | {} | ( कविता बि. अग्रवाल ) |
| कोल्हापूर – ४१६ ००६. | {} | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, |
| दिनांक :२९ जुलै, २०२५. | {} | कोल्हापूर. |

...३/–

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :—**

१ मा. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, राधानगरी

२ मा. सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी.

३ अधीक्षक ( वित्त / प्रशासन ), जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.

**प्रत माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता ईमेलव्दारे रवाना :—**

१ **निकिता चंद्रकांत देसाई,** राहणार १२११, 'ए' वॉर्ड, पहिला बस स्टॉप, फुलेवाडी, कोल्हापूर. ४१६ ०१० **(nikitadesai0398@gmail.com)**

२ **सत्यम महेंद्र कांबळे,** राहणार मुक्काम पोस्ट सुरुल, ता. वाळवा, जिल्हा सांगली. ४१५ ४०७. **(satyamkamble4220@gmail.com)**

आदेशावरुन,

करिता

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर.